Mauli Vidyapeeth's

# Mahila Kala Mahavidyalaya,Beed

## Department of Marathi

**Academic Year 2023-2024**

# Activity List

==================================================

1. Online State Level Marathi General Knowledge Competition
2. Slogan Competition
3. Marathi Language and Employment Opportunity
4. Book Exhibition
5. Ukhana Presentation
6. Calendar Publication
7. Marathi Language Appreciation Day
8. Poster Publication
9. Poetry Reading
10. Guidance of Hon.Principal

# मराठी भाषा गौरव दिन 2023-2024

**छायाचित्रे**




मराठी विभागाच्यावतीने आयोजित कविवर्य वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज जन्म दिवस "मराठी भाषा गौरव दिन" साजरा करण्यात आला.याप्रसंगी भौगोलिक परिसरानुसार मराठी बोली भाषा या विषयावर तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, डॉ.रवींद्र ढास व विद्यार्थीनी.




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर




मराठी भाषा गौरव दिनाचे प्रास्ताविक करताना मराठी विभाग प्रमुख डॉ.रवींद्र ढास, व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर.




कविवर्य वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला.त्याप्रसंगी कुसुमाग्रज यांची ‘कणा’ कविता सादर करताना कु.पवार निशा.

## बातमी




चंपावतीपत्र
CHAMPAVATEE PATRA
THURSDAY29 FEBRUARY 2024-PAGE-8 PRICE-3 RUPEES | www.epaper.champavateepatra.in| champavatee@gmail.com | R.N.I. Regd No.113
गुरुवार, दि.२९ फेब्रुवारी २०२४ । पाने ८ किंमत रु.३ | www.epaper.champavateepatra.in| champavatee@gmail.com | R.N.I. Regd No.1134


### शीर्षक- मराठी भाषेला संतांचा,साहित्यिकांचा वारसा आहे - डॉ. संध्या आयस्कर

### महिला कला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

येथील माऊली विद्यापीठ संचलित, महिला कला महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने कविवर्य वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, मराठी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र ढास यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते कविवर्य वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले व ''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी'' या अभिमान गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी मराठी विभागाच्या वतीने ''भौगोलिक परिसरानुसार मराठी बोलीभाषा'' या विषयावर तयार करण्यात आलेल्या भितीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थिनी डोंगरे सुनीता हिने 'शृंगार मराठीचा', मसवले शामबाला या विद्यार्थिनीने ही मायभूमी आणि शीलता गोविंदपुरम या विद्यार्थिनीने कुसुमाग्रजांची 'कणा' या कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र ढास यांनी केले. त्यांनी आपल्या प्रस्ताविकातून कुसुमाग्रजांचे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान, कुसुमाग्रजांनी मराठी भाषा ज्ञान भाषा होण्यासाठी घेतलेले परिश्रम सांगून कुसुमाग्रजांच्या कविता, कथा, नाटके, कादंबऱ्यांचे आशयसूत्र थोडक्यात विशद केले व मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक आहे असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी सांगितले की, आज जागतिक स्तरावर मराठी भाषा पोहोचलेली आहे. मराठी भाषा ही बहुभाषिक असून जगात ज्या भाषा बोलल्या जातात त्या भाषेत मराठीचा अग्रक्रम आहे. मराठी भाषेला संतांचा, साहित्यिकांचा वारसा आहे. संतांनी आपल्या काव्यातून, साहित्यातून मराठी भाषेचा गौरव केलेला आहे. बहिणाबाईंनी आपल्या ओव्यातून जीवनानुभव सांगितला. साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध बनवलेली आहे, आपणही आपले शिक्षण मराठी भाषेतून घेतले पाहिजे बोलताना मराठी शब्दांचा वापर केला पाहिजे. सध्याचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाच्या असून या युगामध्ये एकमेकांना संदेशवहन करतो तो मराठी भाषेत केला पाहिजे. मराठी भाषेचा शब्दसंग्रह जास्त असण्याची गरज असून यासाठी वाचन आणि लेखन महत्त्वाचे आहे यातूनच आपली कल्पकता वाढत असते, असे याप्रसंगी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रवींद्र ढास यांनी केले तर आभार कु. पवार निशा या विद्यार्थिनींनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.




### मराठी भाषेला संतांचा, साहित्यिकांचा वारसा आहे-डॉ.आयस्कर

### महिला कला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा 2023-2024

**कृतीयुक्त फोटो**




**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.त्याप्रसंगी ग्रंथाचे वाचन करताना प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, डॉ.सोपान सुरवसे, डॉ.रवींद्र ढास यांच्या समवेत महाविद्यालयीन विद्यार्थीनी.**




**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी माजी विद्यार्थीनींनी संकलित केलेल्या दीर्घ उखाण्यांच्या दिनदर्शिकेचे पकाशन करताना प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, डॉ.सोपान सुरवसे सह महाविद्यालयातील विद्यार्थीनी व डॉ.रवींद्र ढास**




**मराठी भाषा संवर्धनपंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी दीर्घ उखाणा सादर करताना कु.इंगोले निशा. याप्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर डॉ.सोपान सुरवसे व डॉ.रवींद्र ढास**




**मराठी भाषा संवर्धनपंधरवडा निमित्त आयोजित मराठी भाषा आणि रोजगाराची संधी या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.सोपान सुरवसे.**




**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर,विचारमंचावर उपस्थित डॉ.सोपान सुरवसे व डॉ.रवींद्र ढास**





**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या घोषवाक्य स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थीनी.**




**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या घोषवाक्य स्पर्धेतील विद्यार्थीनी.**




**घोषवाक्य लेखनात मग्न असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थिनी.**



ऑनलाईन राज्य स्तरीय मराठी सामा

Send

Questions | Responses 96 | Settings

Total points: 20

ऑनलाईन राज्यस्तरीय मराठी सामान्यज्ञान स्पर्धा दि.26.01.2024

माऊली विद्यापीठ संचलित,

महिला कला महाविद्यालय, बीड

मराठी विभाग

आणि

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त

ऑनलाईन राज्यस्तरीय मराठी सामान्यज्ञान स्पर्धा

दिनांक:-26 जानेवारी 2024

वेळ:- स.11:00- 5:00

आयोजक

डॉ. संध्या आयस्कर

प्र.प्राचार्य

महिला कला महाविद्यालय, बीड

संयोजक

डॉ. रवींद्र ढास

मराठी विभाग प्रमुख


महिला कला महाविद्यालय, बीड

This form is automatically collecting emails from all respondents. Change settings

नाव *

Short-answer text

वर्ग *



ऑनलाईन राज्य स्तरीय मराठी सामा

Send

Questions | Responses 96 | Settings

Total points: 20

96 responses

View in Sheets

Accepting responses

Summary | Question | Individual

Insights

| Average | Median | Range |
|---|---|---|
| 16.6/20 points | 18/20 points | 0-20 points |

Total points distribution



Scores

Release scores

| Email | Score/20 | Score released |
|---|---|---|
| pawanbotre62@gmail.com | 18 | 26 Jan 13:17 |
| deshmukhbd11@gmail.com | 20 | 26 Jan 13:17 |
| mansiupadhyay75@gmail.com | 0 | 26 Jan 13:21 |
| khadakesangita@gmail.com | 20 | 26 Jan 13:22 |
| sambhajibhosale212@gmail.com | 14 | 26 Jan 13:22 |
| amargavit99@gmail.com | 6 | 26 Jan 13:23 |
| anitasownawane@gmail.com | 12 | 26 Jan 13:27 |
| govindapuramsrilatha@gmail.com | 16 | 26 Jan 13:31 |

नाव

96 responses

Pawan Arjun botre

प्रा. डॉ. भूषण प्रदीपराव देशमुख

Mansi Deepak upadhyay

Sangita Kanfade

**मराठी सामान्यज्ञान स्पर्धा गुगल फॉर्म**

## वर्तमानपत्रातील बातमी कात्रणे

# मराठी भाषा,संस्कृती टिकविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची–डॉ.सुरवसे



बीड (रिपोर्टर): येथील माऊली विद्यापीठ संचलित, महिला कला महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ग्रंथ प्रदर्शन, दीर्घ उखाणा सादरीकरण आणि मराठी भाषा आणि रोजगाराची संधी या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम प्रसंगी स्वा. सावरकर महाविद्यालय बीडचे मराठी विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर व मराठी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र ढास यांची विचारमंचावर उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी या गौरव गीताने झाली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने माजी विद्यार्थिनींनी संकलित केलेल्या दीर्घ उखाण्याची दिनदर्शिका तयार करण्यात आली. त्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संकलित उखाणे यांचे वाचन डॉंगरे सुनीता, श्रीलता गोविंदपुरम आणि कुलकर्णी प्राजक्ता या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र ढास यांनी केले. मराठी ही इंडो- युरोपीय भाषाकुळातील एक भाषा असून भारतातील प्रमुख २२ भाषांपैकी मराठी ही एक आहे. मराठी हीराजभाषा असून जोपर्यंत गावागावांमध्ये बोलली, लिहिली जाते आणि त्याद्वारे व्यवहार होतो तोपर्यंत तिला भीती नाही असे सांगून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आयोजनामागील भूमिका प्रास्ताविकातून विशद केली.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सोपान सुरवसे यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना सांगितले की, मराठी ही मातृभाषा वेगवेगळ्या पातळीवर विकसित होताना दिसते. मराठी भाषेचे संवर्धन करीत असताना कवी संमेलने, परिसंवाद, चर्चासत्र यांच्या आयोजनाबरोबरचं लोकसंस्कृतीला समृद्ध करणारे लोकगीत, भलरी गीते, उखाणे यांचे संकलन करून मराठी भाषेचे संवर्धन करणे आवश्यक आहे. मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी जशी विद्यार्थ्यांची आहे, तशीच ती समाजाची सुद्धा आहे मराठी भाषा ही फक्त मातृभाषा नसून दोन समाजाला, संस्कृतीला जोडण्याची काम करते. ती संवादाची भाषा आहे.

कार्यारंभ
Tuesday 2024/01/30

# मराठी भाषा, संस्कृती टिकविण्याची जबाबदारी आपली –सोपान सुरवसे

प्रतिनिधी । बीड



दि.२९ : येथील माऊली विद्यापीठ संचलित, महिला कला महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्यावतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ग्रंथ प्रदर्शन, दीर्घ उखाणा सादरीकरण आणि मराठी भाषा आणि रोजगाराची संधी या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम प्रसंगी स्वा. सावरकर महाविद्यालय बीडचे मराठी विभाग प्रमुख डॉ.सोपान सुरवसे महाविद्यालयाच्या प्रा.संध्या आयस्कर, मराठी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र ढास यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मराठी विभागाच्यावतीने माजी विद्यार्थिनींनी संकलित केलेल्या दीर्घ उखाण्याची दिनदर्शिका तयार करण्यात आली. त्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संकलित उखाणे यांचे वाचन डोंगरे सुनीता, श्रीलता गोविंदपुरम आणि कुलकर्णी प्राजक्ता या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.रवींद्र ढास यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.सोपान सुरवसे यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना सांगितले की, मराठी ही मातृभाषा वेगवेगळ्या पातळीवर विकसित होताना दिसते. मराठी भाषेचे संवर्धन करीत असताना कवी संमेलने, परिसंवाद, चर्चासत्र यांच्या आयोजनाबरोबरचं लोकसंस्कृतीला समृद्ध करणारे लोकगीत, भलरी गीते, उखाणे यांचे संकलन करून मराठी भाषेचे संवर्धन करणे आवश्यक आहे. अध्यक्षी समारोप करताना प्रा.डॉ संध्या आयस्कर यांनी सांगितले की, मराठी भाषा ही राजभाषा असून ती सर्वत्र बोलली जाते. मराठी भाषकांना पत्रकारिता, संचलन निवेदक, प्राध्यापक, अधिकारी होण्याची संधी उपलब्ध आहे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रवींद्र ढास यांनी केली तर आभार निशा पवार हिने मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत.